७

# २००४ च्या अभ्यासक्रमान्वये तयार केलेल्या इयत्ता आठवीच्या नागरिकशास्त्र -पाठयपुस्तकाचा चिकित्सक अभ्यास

**डॉ.केशर रामचंद्र जाधव**

सहप्राध्यापक ,चेंबूर सर्वकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय,चेंबूर, मुंबई.

**प्रस्तावना :-**

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००० आणि २००५' अुसार एन.सी.ई.आर.टी.नेशालेय अभ्यासक्रम बदलला. महाराष्ट्रराज्यात प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम - २००४ अन्वयेशालेय अभ्यासक्रम तयार करण्यात आला. या अभ्यासक्रमावरुन प्रत्येक विषयाचा पाठयक्रम तयार करण्यात आला आहे. राष्टीय शैक्षणिक धोरणाची वैशिष्टये, दहा गाभा घटक, आपल्या राज्य घटनेनेसूचित केलेली राष्टीय मूलतत्त्वे, नैतिक मूल्येव सर्व अध्ययन- अध्यापन प्रक्रिया विद्यार्थी केंद्रीत असावी, स्वयंअध्ययनावर दिलेला भर, प्राथमिक शिक्षणाच्या अखेरीस विद्यार्थ्यांनी विहित क्षमता प्राप्त कराव्यात, अध्ययन व अध्यापन प्रक्रिया आनंददायी व्हावी यावर दिलेला भर यांचा विचार करता नागरिकाशास्त्राचा पाठयक्रम हा अधिक महत्त्वाचा वाटतो. आणि म्हणूनच ह्या सर्व बाबींचा अंतर्भाव इयत्ता आठवीच्या नागरिकशास्त्र पाठयपुस्तकातून कितपत होत आहे, तसेच या सर्व बाबी या इयत्तेच्या नागरिकशास्त्राच्या पाठयक्रमातून साध्य होतात की नाही. के अभ्यासण्यासाठीच संशोधकाने सदर पाठयपुस्तकाचा चिकित्सक अभ्यास केला आहे.

**संशोधनाची गरज :-**

बहुतांशी राष्ट्रीय शिक्षणाची उद्दिष्टे, दहा गाभा घटक, नैतिक मूल्ये, राज्य घटनेत समाविष्ट केलेली राष्ट्रीय मूलतत्त्वे हे सर्व घटक नागरिकशास्त्र विषयाशी संबंधीत असल्याने नागरिकशास्त्र विषय हा शालेय स्तरावर किती महत्त्वाचा आहे हे आपल्या लक्षात येईल. आजच्या शालेय शिक्षणामध्ये पाठयपुस्तक हे एक प्रमुख व प्रभावी साधन म्हणून गणले जाते. आज अध्ययन - अध्यापन आणि मूल्यमापन करताना पाठयपुस्तकातील आशय हाच आधारभूत मानला जातो आणि त्यामुळेच पाठयपुस्तकाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.

आजच्या पाठयपुस्तकांवरील जबाबदारीचा विचार करता ही पुस्तके आदर्श व दर्जेदार, अद्ययावत असायला पाहिजेत. विद्यार्थ्यामध्ये असलेल्या विविध क्षमतांचा विकास साधणारी, आवश्यक गुण विकसित करणारी, वर्तनाला योग्य वळण लावणारी, विद्यार्थ्यांना आपल्या जबाबदारीची जाणीव करून देणारी व विविध स्तरावरील उद्दिष्टे साध्य करणारी असायला हवीत. म्हणूनच पाठयपुस्तकांच्या योग्यतेकडे लक्ष देणे आवश्यक आहे. त्यांची योग्यता व दर्जा उंचावण्यासाठी त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा होणे गरजेचे आहे. हाच दृष्टिकोन समोर ठेवून संशोधकाने 'इयत्ता ८वी च्या नागरिकशास्त्र पाठयपुस्तकाचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर संशोधन केले.

**समस्येचे शब्दांकन :-**

२००४ च्या अभ्यासक्रमान्वये इयत्ता आठवीच्या नागरिकशास्त्र पाठयपुस्तकाचा चिकित्सक अभ्यास करणे'.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१) प्रस्तुत पाठयपुस्तकांच्या बाहय वैशिष्टयांचा अभ्यास करणे.

२) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व राष्ट्रीय शिक्षण आढाव्यानुसार तयार केलेल्या अभ्यासक्रमातील नागरिकशास्त्र पाठयक्रमाची उद्दिष्टे, भारांश व प्रस्तुत पाठयपुस्तकांमधील आशय यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणे.

३) अभ्यासक्रमाने ठरविलेली मूल्ये व सदर पाठयपुस्कातील आशय यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणे.

४) सदर पाठयपुस्तकातील आशय व राष्टीय मूलतत्त्वे याच्यातील संबंधाचा अभ्यास करणे.

५) प्रस्तुत पाठयपुस्तकातील आशय व गाभातत्त्वे याच्यातील संबंधाचा अभ्यास करणे.

६) प्रस्तुत पाठयपुस्तकातील आशय व अपेक्षित संबोध याच्यातील संबंधाचा अभ्यास करणे.

७) प्रस्तुत पाठयपुस्तकातील आशयाची रचना समकेंद्री पद्धतीने कितपत झाली आहे याचा अभ्यास करणे.

८) प्रस्तुत पाठयपुस्तकातील आशय व दाखले यांच्यांतील संबंधाचा अभ्यास करणे.

९) प्रस्तुत पाठयपुस्तकातील घटकांची रचना करताना अध्यापन सूत्रांचा वापर कितपत केला आहे याचा अभ्यास करणे.

१०) प्रस्तुत पाठयपुस्तकातील आशय अन्य शालेय विषयांशी व मानवी जीवनाशी समवाय साधण्यास कितपत उपयुक्त ठरतो याचा अभ्यास करणे.

११) प्रस्तुत पाठयपुस्त शिक्षकांना अध्यापनसाधन म्हणून कितपत उपयोगी पडते याचा अभ्यास करणे.

१२) प्रस्तुत पाठयपुस्तकातील आशय व स्वाध्याय विद्यार्थ्याच्या पातळीस अनुकूल आहे की नाही याचा अभ्यास करणे.

१३) प्रस्तुत पाठयपुस्तकातके ही विद्यार्थ्यास स्वयंअध्ययनास प्रोत्साहित करतात की नाही याचा अभ्यास करणे.

१४) प्रस्तुत पाठयपुस्तकाचा अभ्यास विद्यार्थ्यांना एक आनंददायी अनुभव ठरतो की नाही याचा अभ्यास करणे.

१५) प्रस्तुत पाठयपुस्तक हे विद्यार्थ्यांना आपलेसे वाटते की नाही याचा अभ्यास करणे.

१६) प्रस्तुत पाठयपुस्तक नागरी व ग्रामीण विद्यार्थ्यांना अध्ययन-साधन म्हणून उपयोगी पडतेकी नाही याचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतके :-**

१) सामान्यपणे पाठयपुस्तक हे अभ्यासक्रमातील उद्दिष्टांचा विचार करून तयार केलेलेअसते.

२) सामान्यपणेविशिष्ट इयत्तेसाठी तयार केलेले पाठयपुस्तक हे संबंधित इयत्तेच्या विद्यार्थ्यांना अध्ययनास उपयोगी पडते.

**संशोधनाचा हेतू/महत्त्व :-**

राष्ट्रीय शिक्षण आराखडया अन्वये प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रमाने नागरिकशास्त्र विषयाचा पाठयक्रम तयार केलेला आहे.त्यानुसार इयत्ता आठवीच्या नागरिकशास्त्र विषयाचे पाठयपुस्तक लिहितांना कोणती उद्दिष्टे अनुसरली आहेत, नैतिक मूल्ये, गाभा तत्त्वे, राष्ट्रीय उद्दिष्टे , मूलभूत तत्त्वे यांचा प्रस्तुत पाठयपुस्तकामध्ये समावेश केला आहे किंवा नाही. त्याचप्रमाणे हे वरील घटक साध्य करण्यास सदर पाठयपुस्तक योग्य आहे किंवा नाही, तसेच आदर्श व दर्जेदार पाठयपुस्काची निर्मिती व रचना झाली आहे किंवा नाही, अभ्यासक्रम समितीने केलेल्या पाठयपुस्कासंबंधी शिफारशींचा सदर पाठयपुस्तक तयार करतांना विचार केला आहे कि नाही, पाठयपुस्कातील आशय हा विद्यार्थी वय व आकलन पातळी यांचा विचार करून मांडलेला आहे की नाही, समकेंद्री पद्धतीचा वापर केला आहे की नाही, प्रस्तुत पाठयपुस्तकाचा (विषयाचा) अभ्यास विद्यार्थ्यांना आनंददायी अनुभव ठरतो की नाही, हे पाठयपुस्तक विद्यार्थ्यांना आपलेसे वाटते की नाही, तसेच ते नागरी व ग्रामीण विद्यार्थ्यांना अध्ययन-साधन म्हणून उपयोगी पडते की नाही, हे पाहण्यासाठीच संशोधकाने प्रस्तुत पाठयपुस्तकाचा चिकित्सक अभ्यास केला आहे आणि हेच या संशोधनाचे महत्त्व किंवा मुख्य हेतू आहे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-**

प्रस्तुत संशोधनासाठी ठाणे जिल्हा निवडला असल्याने सदर निष्कर्ष हे तेथील विद्यार्थी ,शिक्षक व पालक यांना उपयोगी पडणारे असतील. संशोधनाची व्याप्ती ही प्रथम दर्शनी ठाणे जिल्हयापुरती असली तरी सदर पाठयपुस्तक हे महाराष्ट्रातील सर्व उच्च प्राथमिक शाळांना सारखेच असल्यामुळे संशोधनातून निघालेले निष्कर्ष हे महाराष्ट्रातील सदर इयत्ताचे सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक यांना सुद्धा लागू पडतील.

**मर्यादा :-**

१) सदर संशोधन हे इयत्ता आठवी महाराष्ट्र शासनमान्य प्राथमिक अभ्यासक्रम (२००४) याच्यासाठी मर्यादित केले आहे.

२) महाराष्ट्र शासनमान्य उच्च प्राथमिक अभ्यासक्रम २००४ अन्वये महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे याने तयार केलेले इयत्ता आठवीचे नागरिकशास्त्र विषयाचे पाठयपुस्तक येथे प्रमाणभूत मानले आहे व त्याच्या मधील आशयापुरेत सदर संशोधन मर्यादित केले आहे.



Vol:1st , Issue : IV, English-Marathi, Quarterly: 1st March 2013,ISSN : 2319-5525

३) न्यादर्श मर्यादा निश्चित करताना जनसंख्येचा विचार करुन इयत्ता आठवीला नागरिकशास्त्र विषयाच्या अध्यापनाचा अनुभव असलेले२६५ शिक्षक, ४० तज्ज्ञशिक्षक, दाखल्यांच्या अभ्यासाठी ४० शिक्षक, ४० विद्यार्थी प्रश्नावली साठी, मुलाखत मसुदयासाठी ४० पालक व अध्यापन निरीक्षणासाठी ४० शिक्षक मर्यादित केलेआहेत.

४) सदर संशोधनासाठी संशोधकानेवर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण व दस्तऐवज पृथक्करण संशोधन पद्धती मर्यादित केली आहे.

५) सदर संशोधनासाठी महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्हातील सर्व १५ महसुळ तालुके मर्यादित केलेआहेत.

**संशोधनाची कार्यपद्धती :-**

**१) न्यादर्श** :- न्यादर्शाची निवड करताना ठाणेजिल्हयातील सर्व १५ तालुक्यातील इयत्ता आठवीला नागरिकशास्त्र विषयाचेअध्यापनाचा अनुभव असलेले२६५ माध्यमिक शाळेतील शिक्षक, ४० तज्ज्ञशिक्षक, दाखल्यांच्या अभ्यासासाठी ४० शिक्षकांची पडताळासूचीसाठी, ४० विद्यार्थी, मलाखत मसुदयासाठी ४० पालक व अध्यापनाचेनिरीक्षण करण्यासाठी ४० शिक्षकांची निवड केली आहे.

**२) संशोधन पद्धती :-** सदर संशोधन विषय हा वर्तमानकालीन नागरिकशास्त्र पाठयपुस्तकाचा चिकित्सक अभ्यास करणेहा असल्यामुळेया संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीमधील दस्तऐवज पृथक्करण व सर्वेक्षण पद्धतींचा वापर केला आहे.

**३) संशोधनाची साधने :-**

१) अधिकृत कागदपत्रे :- १) प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम -२००५.२) इयत्ता आठवीचे नागरिकशास्त्र विषयाचे पाठयपुस्तक.३) इयत्ता आठवीची नागरिकशास्त्र धोरण व राष्टीय शिक्षण आराखडा विषयक

मकाराष्ट्र शासनाची कागदपत्रे.

२) प्रश्नावली: १) शिक्षकांसाठी २) तज्ज्ञ शिक्षकांसाठी व

३) विद्यार्थ्यासाठी भिन्न प्रश्नावली.

३) शिक्षक पडताळासूची

४) निरीक्षण तक्ते

५) पालक मुलाखत मसुदा

४) सांख्यिकी:-

१) न्यासाचे वर्गीकरण करून वारंवशिता काढणेव कोष्टके तयार करणे

२) व्यक्त मतांची टक्केवारी काढणे.

३) संख्याशास्त्राचा वापर करून 'व्यक्त मतांची टक्केवारी शिक्षकांसाठी ५७% किंवा त्यापेक्षा अधिक, तज्ज्ञ शिक्षकांसाठी, विद्यार्थी, पालक व अध्यापन निरीक्षणासाठी ६६% किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास ती मते ग्राहय मानावी अथवा ते मत बाद ठरविण्यात आले.

**निरीक्षणे व निष्कर्ष :-**

१) प्रस्तुत पाठयपुस्तकाचेमुखपृष्ठ हेआकर्षक, विद्यार्थ्यामध्ये आवड व उत्सुकता वाढविणारेअसून ते विद्यार्थ्याच्या वयोगटानुरूप आहे.

२) प्रस्तुत पाठयपुस्तकाच्या मुखपृष्ठावरुन आशयाची कल्पना येते व तेआशयाशी सुसंगत आहे.

३) प्रस्तुत पाठयपुस्तकाच्या मुखपृष्ठावरील छपाईचा टाईप विद्यार्थी वयोगटास योग्य असून, छपाई ठळक, स्पष्ट व लक्षवेधी आहे.

४) प्रस्तुत पाठयपुस्तकाचा कागद दर्जेदार असून आकार विद्यार्थ्याना हाताळण्यास योग्य आहे.

५) प्रस्तुत पाठयपुस्तकाला दिलेले शीर्षक पाठयक्रमांशी सुसंगत असून पाठयपुस्तकाची किंमत वाजवी आहे.

६) प्रस्तुत पाठयपुस्तक नागरिकशास्त्र पाठयक्रमाच्या उद्दिष्टांनुसार आशय देण्यास मदत करते.

७) प्रस्तुत पाठयपुस्तक अभ्यासक्रमाने ठरविलेल्या नैतिक मूल्यांनुसार आशय देते.

८) प्रस्तुत पाठयपुस्तक राज्य घटनेने सूचित केलेल्या राष्टीय मूलतत्त्वांनुसार आशय देते.

९) प्रस्तुत पाठयपुस्तक गाभातत्त्वानुसार आशय देण्यास उत्तम मदत करते.

१०) प्रस्तुत पाठयपुस्तकातील संबोधांचे स्पष्टीकरण योग्य असून विद्यार्थ्याच्या वयोगटानुरुप आहे.

११) प्रस्तुत पाठयपुस्तकातील आशयाची रचना समकेंद्री पद्धतीने केलेली आहे.

१२) प्रस्तुत पाठयपुस्तकातील आशयाच्या स्पष्टीकरणासाठी पुरेसे व समर्पक दाखले दिलेले आहेत.

१३) प्रस्तुत पाठयपुस्तकातील घटकांची रचना करताना विविध अध्यापन सूत्रांचा वापर केलेला आहे.

१४) प्रस्तुत पाठयपुस्तकातील पाठांची रचना पूर्वज्ञानावर आधारित असून लिखाणाची भाषा सुबोध, मनोरंजक व विद्यार्थ्यांना आनंददायी अनुभव देणारी आहे.

१५) प्रस्तुत पाठयपुस्तकातील पाठांना व मुद्दयांना दिलेली शीर्षके पाठातील आशयाशी सुसंगत आहेत.

१६) प्रस्तुत पाठयपुस्तकातील आशय इतर शालेय विषयांशी समवाय साधण्यास सुसंगत आहे.

१७) प्रस्तुत पाठयपुस्तकातील स्वाध्यायातील प्रश्न अध्ययन मुद्दयांशी सुसंगत असून प्रश्नांची संख्या पुरेशी आहे.

१८) प्रस्तुत पाठयपुस्तकातील स्वाध्यायातील प्रश्नांची काठिण्यापातळी मध्यम असून बहुतांशी प्रश्न स्वयंअध्ययनास प्रवृत्त करणारे आहेत.

१९) प्रस्तुत पाठयपुस्तक हे नागरी व ग्रामीण अशा दोन्ही भागासाठी उपयुक्त आहे.

२०) प्रस्तुत पाठयपुस्तक अध्यापन व अध्ययन साधन म्हणून उपयुक्त असून विद्यार्थ्यांना ते आपले सेवाटणारे आहे व ते विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनास प्रवृत्त करते.

२१) प्रस्तुत पाठयपुस्तकात परिशिष्ट व संदर्भ पुस्कांची यादी देणे आवश्यक आहे.

२२) प्रस्तुत पाठयपुस्तकातील आशय २५ गुणांसाठी पुरेसा आहे.

२३) प्रस्तुत पाठयपुस्तकातून मिळणारे ज्ञान हेव्यवहारोपयोगी आहे.

२४) प्रस्तुत पाठयपुस्तकातील आशयाच्या स्पष्टीकरणार्थ शिक्षक संदर्भ ग्रंथाचा आधार घेतात.

**शिफारशी :-**

१) प्रस्तुत पाठयपुस्तकातकाची बांधणी ही शिलाई घालून केली असली तरी ती बांधणी टिकाऊवाटत नाही. तर ती जाड टिकाऊधाग्याने जवळ जवळ टाके टाकून केलेली असावी.

२) प्रस्तुत पाठयपुस्तकातील धडयांच्या शेवटी संबोधांचे अर्थ दयावेत.

३) प्रस्तुत पाठयपुस्तकातील आशयाच्या स्पष्टीकरणार्थ उदाहरणांचे प्रमाण वाढवणे आवश्यक आहे.

४) स्वाध्यायातील प्रश्न कुशाग्र बुद्धिमता असलेल्या विद्यार्थ्यांना चालना देण्यासाठी उपयोजनात्मक असावेत.

५) ग्रामीण भागातील पालकांचा विचार करता प्रस्तुत पाठयपुस्तक हे विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनास उपयुक्त होईल असेअसावे.

६) प्रस्तुत पाठयपुस्तकात विस्तृतपणा व भाषाशैली विद्यार्थ्यांच्या दृष्टीने कठिण वाटते तो विस्तृपणा कमी व भाषा शैली सोपी करावी.

७) प्रस्तुत पाठयपुस्तकातील माहिती २५ गुणांच्या मानाने जास्त असल्यानेती कमी करावी.

८) पाठयपुस्तकातील आशयाची रचना अध्यापन सूत्रे समोर ठेवून करावी.

**संदर्भसुची :-**


१) कदम चा.पा.(१९८९), शैक्षणिक संख्याशास्त्र, नूतन प्रकाशन, पुणे-३०.

२) गॅरेट एच.ई.(१९८१), स्टॅटेस्टिक्स इन साएकोलॉजी ऍण्ड एज्युकेशन, मिसेस ए.एफ.सर फॉर वकिल्स, फेफर ऑण्ड सिमन्स लि.मुंबई - ३८.

३) पाटील निर्मला(१९९०), नागरिकशास्त्राचे अध्यापन, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर.

४) बुच एम.बी. पहिला तेसातवा सर्व्हे ऑफ रिसर्चेस इन एज्युकेस्शन, एन.सी.ई.आर.टी., नवी दिल्ली.

५) भिंताडे व्ही.आर(२००६), शैक्षणिक संशोधन पद्धती,नित्य नूतन प्रकाशन पुणे-३०

६) जाधव केशर आर(२०११),कृतिसंशोधन, शुभाय प्रकाशन, मुंबई -३१.

७) महाराष्ट्र शिक्षण विभाग उच्च प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम -२००५, म.रा.मा.व.ड.मा.शिक्षण मंडळ, पुणे.


• • •

माणूस किती जगतो, या
पेक्षा तो कसा जगतो यालाच महत्त्व आहे.

- कुसुमाग्रज



Vol:1st , Issue : IV, English-Marathi, Quarterly: 1st March 2013,ISSN : 2319-5525